# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक**

**विषय : विद्यापीठ विभाग व संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्र पीएच.डी. अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया २०२२-२३**

**संदर्भ** : १. विद्यापीठ परिपत्रक संदर्भ क्र. शै.प्रवेश/६२७४ दि. २९/१२/२०२२
२. विद्यापीठ परिपत्रक संदर्भ क्र. शै.प्रवेश/४५५ दि. २०/०१/२०२३

कृपया वरील संदर्भिय परिपत्रकांचे अवलोकन करावे, ज्या अन्वये सन २०२२-२३ साठी पीएच्.डी. अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी सूचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या. तथापि सर्व संशोधन केंद्रांची प्रवेश प्रक्रिया अद्याप पूर्ण झाली नसल्यामुळे सदर प्रवेश प्रक्रिया पार पाडण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

- सन २०२२-२३ साठी पेट परीक्षेस अर्ज सादर करतेवेळी काही विद्यार्थ्यांकडे EWS प्रमाणपत्र उपलब्ध नव्हते. तथापि EWS प्रमाणपत्र विलंबाने मिळाल्या कारणाने बरेच परीक्षार्थी EWS प्रवर्गातील प्रवेशासाठी विद्यापीठाकडे परवानगीसाठी विनंती करत आहेत. सदर विद्यार्थ्यांचा या प्रवेश प्रक्रियेत समावेश होण्यासाठी अराखीव (Unreserved) प्रवर्गातील उमेदवाराकडे आजमितीस २०२२-२३ चे शासन निर्गमित आर्थिक दुर्बल घटकात मोडत असल्याचे (EWS) प्रमाणपत्र उपलब्ध झाले असेल तर अशा विद्यार्थ्यांचा EWS या प्रवर्गामध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी विचार करावा.

- पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया २०२२-२३ साठी नव्याने दिलेल्या विभागीय संशोधन समितीसमोर आपल्या संशोधन केंद्रामार्फत **दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३** पर्यंत मुलाखती घेण्यात याव्यात व मुलाखतीचा अहवाल त्वरीत विद्यापीठास सादर करावा.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. शै.प्रवेश/९१०
दिनांक : १३/०२/२०२३

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :—**

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
२. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
३. मा. संचालक, विद्यापीठ सर्व मान्यताप्राप्त संस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ